दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
वादळ वार्ता
vadalvartanews@gmail.com
संपादक : अजय भांगे
https://epaper.vadalvarta.com
बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | सोमवार दि.९ फेब्रुवारी २०२६ | 9422660077 | आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ | वर्ष ३ रे | अंक १६५ | पाने ४ | किंमत ४ रुपये
Beed (Mahmar) Daily Marathi | Monday 9 Feburary 2026 | 9422660077 | RNI-MAHMAR / 2023 / 87555 | Year - 3rd | Issue 165 | Pages 4 | Rate 4 Rs

मविआ संपली, उद्धव ठाकरे एकटेच

मुंबई–उद्धव ठाकरे यांना पुन्हा विधान परिषदेत जायचे असल्यास इतर पक्षांचा पाठिंबा आवश्यक आहे. काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस त्यांना विधान परिषद निवडणुकीत साथ देतात का, हे पाहावे लागेल. त्या पाठिंब्याशिवाय त्यांचे आमदार होणे शक्य नाही. उद्धव ठाकरे यांनी यापूर्वी विधान परिषदेवर निवड होऊन मुख्यमंत्रीपदाची जबाबदारी सांभाळली होती. मात्र सध्याच्या परिस्थितीत त्यांच्या समोर कोणतीही थेट निवडणूक उपलब्ध नाही. त्यामुळे सभागृहात जाण्यासाठी विधान परिषदेचा मार्ग हाच एकमेव पर्याय उरतो, असे मत मंत्री संजय शिरसाट यांनी व्यक्त केले आहे.महाविकास आघाडीबाबत बोलताना शिरसाट यांनी स्पष्ट केले की, काँग्रेसने अनेक ठिकाणी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका स्वबळावर लढवल्या आहेत. त्यामुळे महाविकास आघाडी आता अस्तित्वात राहिलेली नाही. काँग्रेसची शरद पवार गटासोबत जाण्याचीही इच्छा उरलेली नाही, तर उद्धव ठाकरे गटाला त्यांनी आधीच बाजूला केले आहे.

राष्ट्रवादीचे दोन्ही गट एकत्र यावे हे अजित पवारांचे स्वप्न होते

आमच्या पुढेच एकत्र येण्याची चर्चा झाली होती–अभिनेते सयाजी शिंदे यांचा दावा

अभिनेते सयाजी शिंदे यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे दोन्ही गट एकत्र येण्याची चर्चा आमच्या पुढेच झाली होती, असा दावा करत एकच खळबळ उडवून दिली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे दोन्ही गट एकत्र यावेत हे अजित पवारांचे स्वप्न होते. आमच्यापुढेच एकत्र येण्याची चर्चा झाली होती, असे त्यांनी म्हटले आहे. अजित पवारांच्या निधनानंतर दोन्ही राष्ट्रवादीच्या विलीनीकरणाची चर्चा थंड बस्त्यात पडल्याचा दावा केला जात असताना सयाजी शिंदे यांनी हे विधान केले आहे हे विशेष.सयाजी शिंदे यांनी रविवारी एका मराठी वृत्तवाहिनीशी संवाद साधला. त्यात त्यांनी राष्ट्रवादीच्या दोन्ही गटांनी एकत्र येण्याची भावना व्यक्त केली. ते म्हणाले, अजित पवारांनी सर्वधर्म समभाव घेऊन, गरीब – श्रीमंत न पाहता, खालून आल्यामुळे सर्वकाही खूप पुढे घेऊन जाण्याचे ठरवले होते. मला असे वाटते की, त्यांचे हे स्वप्न आपण सगळ्यांनी स्पेशली सुनेत्रा वहिनी, सुप्रिया ताई व पवारांनी पुढे न्यायला पाहिजे. दोन्ही गट एकत्र यावेत हे दादांचे पहिले स्वप्न होते. त्यांचे अपूर्ण राहिलेले स्वप्न पूर्ण व्हावे अशी आमची इच्छा आहे. असे झाले तरच महाराष्ट्राची ताकद वाढेल.



दैनिक वादळ वार्ता
मुंबई । प्रतिनिधी

महाराष्ट्राची ताकद वाढवायची असेल तर दोन्ही पवार कुटुंबांनी ताबडतोब एकत्र आले पाहिजे. त्यांचे काही कौटुंबीक इगो असतील किंवा त्यांच्या काही भावना असतील तर त्या त्यांनी बाजूला ठेवल्या पाहिजे, असे ते म्हणाले.सयाजी शिंदे यांनी राष्ट्रवादीच्या एकत्रीकरणाची चर्चा आपल्यापुढेच झाली होती असाही दावा केला. आमच्यासमोर बोलणे झाले होते की, हे आता सर्व एकत्रपणे सुरू होईल. पण आता ते अचानक असे घडल्यामुळे कुणी त्याला वेगळे वळण देऊ नये. दोन्ही पक्षांनी एकत्र येऊन हे काम पुढे नेले तरच महाराष्ट्र चांगला राहील. विकसित महाराष्ट्र होईल, असे सयाजी शिंदे म्हणाले.उल्लेखनीय बाब म्हणजे अजित पवार यांचा गत २८ जानेवारी रोजी विमान अपघातात मृत्यू झाला. त्यांच्या निधनानंतर राष्ट्रवादीच्या दोन्ही गटांत सुरू असलेली विलीनीकरणाची चर्चा थंडावली आहे. राष्ट्रवादीच्या शरद पवार गटाच्या नेत्यांनी अजित पवार विलीनीकरणासाठी आग्रही होते असा ठाम दावा केला आहे. पण सत्ताधारी राष्ट्रवादीच्या प्रफुल्ल पटेल, सुनील तटकरे आदी नेत्यांनी शरद पवार गटाशी अशी कोणतीही चर्चा सुरू नव्हती, असे स्पष्ट करत त्यांचा दावा फेटाळून लावला आहे. यामुळे विलीनीकरणाची चर्चा थंड बस्त्यात पडली आहे. पण आता सयाजी शिंदे यांनी विलीनीकरणाची चर्चा माझ्यापुढेच झाली होती असा दावा केला आहे. त्यावर राष्ट्रवादीचे नेते काय प्रतिक्रिया देतात हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

आजंदे येथे आरोग्य उपकेंद्र कायम बंद उपकेंद्र गाई-म्हशींसाठी की माणसांसाठी?

दैनिक वादळ वार्ता
जळगाव । जितु इंगळे

रावेर तालुक्यातील आजंदे येथील आरोग्य उपकेंद्र गेल्या अनेक दिवसांपासून कायम बंद असल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. उपकेंद्र अस्तित्वात असूनही प्रत्यक्षात ते निष्क्रिय असल्याने परिसरातील नागरिकांना उपचारासाठी पाच ते दहा किलोमीटर अंतरावरील रावेर किंवा एनपूर येथे धाव घ्यावी लागत आहे.

आजंदे प्राथमिक आरोग्य केंद्राच्या अखत्यारीत असलेले हे उपकेंद्र केवळ लसीकरणाच्या दिवशीच उघडले जाते. इतर दिवशी अधिकारी व कर्मचारी येथे येत नसल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. उपकेंद्रात निवासाची व्यवस्था असतानाही कोणताही कर्मचारी येथे वास्तव्यास तयार नाही. परिणामी, उपकेंद्र असूनही आरोग्य सेवा पूर्णतः ठप्प आहे.

पावसाळ्यात रस्त्यांची अवस्था खराब असल्याने रुग्णांना अधिक त्रास सहन करावा लागतो. आरोग्य विभागाकडून कोणतीही ठोस उपाययोजना करण्यात आलेली नसून अधिकारी केवळ उडवाउडवीची उत्तरे देत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.

कोरोनानंतर नागरिक आरोग्याबाबत अधिक जागरूक झाले असून किरकोळ आजारासाठीही दवाखान्यात जाण्याची गरज निर्माण झाली आहे. शहरात खासगी व शासकीय रुग्णालयांची सुविधा उपलब्ध असताना ग्रामीण भागात मात्र हीच सुविधा नाही. शासन आरोग्यासाठी मोठ्या प्रमाणावर निधी खर्च करत असले तरी त्या सुविधा ग्रामीण भागापर्यंत पोहोचत नसल्याने या सुविधा नेमक्या कोणासाठी, असा सवाल ग्रामस्थ उपस्थित करत आहेत.

बोगस डॉक्टरांचा सुळसुळाट

ग्रामीण भागात शासकीय आरोग्य सेवा उपलब्ध नसल्यामुळे नागरिकांना खाजगी रुग्णालयात जावे लागत आहे. याच संधीचा फायदा घेत पश्चिम बंगाल, उत्तरप्रदेशसह इतर राज्यातील बोगस डॉक्टरांनी ग्रामीण भागात बेकायदेशीरपणे रुग्णालये थाटल्याचे चित्र आहे. वैद्यकीय शिक्षण व परवानगी नसतानाही उपचार सुरू असल्याचा गंभीर प्रकार उघडकीस येत आहे.

ओपीडी बंदच

प्रत्येक प्राथमिक आरोग्य उपकेंद्रात सकाळी ८.३० ते दुपारी १२.३० वाजेपर्यंत ओपीडी सुरू असणे बंधनकारक आहे. मात्र आजंदेसह अनेक ग्रामीण भागातील उपकेंद्रांमध्ये ओपीडी बंद असल्याचे वास्तव आहे. त्यामुळे नागरिकांना शासकीय आरोग्य सेवा मिळत नसून त्यांना खाजगी रुग्णालयात जावे लागते आहे.

आजंदे ग्रामस्थांनी उपकेंद्रात कायमस्वरूपी डॉक्टर व कर्मचारी नियुक्त करून नियमित ओपीडी सुरू करण्याची मागणी केली आहे. तालुका आरोग्य अधिकारी व जिल्हा प्रशासनाने तातडीने लक्ष घालावे, अशी जोरदार मागणी होत आहे.

शेतकरी राजा सामाजिक समितीच्या राज्य प्रवक्ता पदी अशोक सोनवणे यांची निवड

दैनिक वादळ वार्ता
बीड । प्रतिनिधी

मी प्रथम भारतीय आणि अंतिम ही भारतीय; शेतकऱ्यांचा सन्मान हीच देशाची शान हे ब्रीदवाक्य घेऊन तसेच छत्रपती शिवाजी महाराज, शहीद भगतसिंग, यांच्या विचारांनी प्रेरित होऊन शेतकरी राजा सामाजिक समिती राज्यभर सर्वसामान्यांना न्याय मिळवून देण्यासाठी नेहमी पुढे आली आहे. शेतकरी, कष्टकरी, कामगार, तसेच अठरापगड समाज बांधवांना सोबत घेऊन अन्यायाला वाचा फोडण्याचे काम तसेच शासन दरबारी सामान्यांचे प्रश्न मांडून संविधानिक मार्गाने न्याय मिळवून देण्याचे काम शेतकरी राजा सामाजिक समिती राज्यभरात करत आहे. याच अनुषंगाने संघटन राज्यभर मजबूत उभे करण्यासाठी शेतकरी राजा सामाजिक समितीचे

प्रदेशाध्यक्ष रोहित धुरंधरे, यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच मराठवाडाध्यक्ष प्रवीणजी पालिमकर, यांच्या शिफारशीने अशोक सोनवणे यांची शेतकरी राजा सामाजिक समितीच्या राज्यप्रवक्तापदी सर्वानुमते नियुक्ती करण्यात आली आहे. राज्यात संघटन वाढवून सर्वसामान्यांच्या प्रश्नाचे, त्यांच्या अडचणीचे निराकरण आपल्या संघटनेच्या माध्यमातून करता यावे हेच ध्येय घेऊन संघटना पुढे चालत आहे. यावेळी बोलताना प्रदेशाध्यक्ष धुरंधरे यांनी संघटनेचे ध्येय, धोरण, उद्दिष्ट, कार्यकर्त्यांना समजावून सांगितले. तसेच नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्र देऊन पुढील कार्यास शुभेच्छा देखील दिल्या. तसेच पदाधिकाऱ्यांवर विश्वास दाखवत आपण संघटनेत राहुन शेतकरी हिताच्या आणि देश सेवेच्या विचाराशी प्रामाणिक राहून सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक, सांस्कृतिक, क्षेत्रात उत्तुंग काम करून वंचित उपेक्षित, सामान्य, व शेतकऱ्यांना न्याय मिळवून देत. अत्याचाराच्या विरोधात आवाज उठवून आपण समाजात प्रभावशाली काम करा. आणि शहीद भगत सिहं यांच्या क्रांतिकारी विचारधारेने तरुण वर्गात आपल्या संघटनेचे विचार पेरून संघटनेचे पाळेमुळे राज्यात मजबूत करा अशी आशा बोलताना व्यक्त केली. यावेळी उपस्थित शेतकरी राजा सामाजिक समितीची प्रदेशाध्यक्ष रोहित धुरंधरे, मराठवाडाध्यक्ष प्रवीणजी पालीमकर, बीड तालुकाध्यक्ष अशोक दादा ढोले पाटील, महादेव मातकर नाना, बीड उपतालुकाध्यक्ष तावरे, पत्रकार वैष्णव गावडे, तसेच संघटनेचे कार्यकर्ते मोठ्या संख्येत यावेळी उपस्थित होते.

केज शहरातील फूलेनगर येथे त्यागमुर्ती रमाबाई आंबेडकर जयंती साजरी

दैनिक वादळ वार्ता
केज । प्रतिनिधी

केज शहरातील महात्मा फुलेनगर येथे त्यागमुर्ती रमाबाई आंबेडकर यांची जयंती महिलांचे आरोग्य शिबीर घेऊन साजरी करण्यात आली.त्यागमूर्ती ज्या माऊलीने विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना घडविले अशा माता रमाबाई आंबेडकर यांची जयंती शनिवारी म.फुले नगर,हाउसिंग कॉलनी येथे मोठ्या उत्साहात महिलांच्या विविध आरोग्य तपासण्या करून साजरी करण्यात आली. प्रसंगी प्रमुख उपस्थितीत नगराध्यक्षा डॉ.सीताताई बनसोड,उद्घाटक नगर सेविका पद्मिन अक्का शिंदे,महानंदाताई गायकवाड,प्रमिलाताई मस्के,प्रमुख उपस्थिती म्हणून उपस्थितीत डॉ. प्रमीता कांबळे,मनिषाताई घुले,कविताताई कराड, अँड.अनिताताई मुंडे, अनिताताई कांबळे, संगीताताई साळवे, शीतलताई लांडगे, प्रियंकाताई लांडगे, तस्लिमा इनामदार, प्रियंका सुमेध शिंदे, मंदाकिनी घाडगे मॅडम, शारदाताई गुंड,विमलताई जोगदंड,सारिकाताई शिंदे वर्षा राख,प्रियांका शिंदे सह महिलांची उपस्थिती मोठ्या प्रमाणात होती.

वादळी कट्टा

सत्तेच्या लालसेत तत्त्वांना दिला तडा,
पक्ष फुटला स्वार्थासाठी, विचारांना पडला पडदा.

कालचे साथीदार आज खुर्चीसाठी वैरी,
जनतेचा विश्वास मात्र पडला नेत्यांनीच कारी.

एकतेची भाषा, मन मात्र सौदेबाजी,
लोकशाहीच्या नावाखाली सुरू स्वार्थाचीच बाजी.

पक्षाचे तुकडे, खुर्चीचा खेळ, सत्तेची धाव,
जनतेच्या प्रश्नांचा मात्र नाही कुणाला भाव.

आदर्श गहाण, स्वार्थ झाला सर्वोच्च धर्म,
राजकारणात हरवला सेवा, उरले फक्त कर्म.

संपादक
अजय भांगे

उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांचे खा.रजनीताई पाटील यांच्याकडून सांत्वन

दैनिक वादळ वार्ता
केज । प्रतिनिधी

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांचे विमान अपघातात दुःखद निधन झाले.संपूर्ण महाराष्ट्र शोकाकुल झाला. रविवार रोजी बारामती येथे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्राताई अजितदादा पवार यांची भेट घेऊन खा.रजनीताई अशोकराव पाटील यांनी सांत्वन केले. यावेळी अश्रू अनावर झाले होते.जुन्या आठवणी मन सुन्न करून गेल्या. महाराष्ट्राच्या राजकारणात अजित दादा पवार हे स्पष्टवक्तेपणा, परखडपणा यामुळे कायम स्मरणात राहतील.पाटील आणि पवार कुटुंबाचा कायम स्नेह होता. पवार कुटुंबासाठी हा मोठा धक्का आहे.

दुःख पेलल्या शिवाय पर्याय नाही ते क्रमप्राप्त आहे अशा भावना व्यक्त झाल्या.

मालाड मध्ये बेकायदेशीर बांधकामांवर पालिकेचा बुलडोझर

दैनिक वादळ वार्ता
मुंबई ।अरविंद बनसोडे कुरनूरकर

निवडणुकांनंतर पी-उत्तर प्रभागात बेकायदेशीर बांधकामांविरोधात पालिकेने कठोर भूमिका घेत मोठी तोडक मोहीम राबवली. पी-उत्तर चे सहाय्यक पालिका आयुक्त कुंदन वळवी आणि झोन क्रमांक ४ च्या डीएमसी भाग्यश्री कापसे यांच्या नेतृत्वाखाली शुक्रवारी मार्वे रोड आणि मालाड लिंक रोड परिसरात बुलडोझर ने कारवाई करण्यात आली.प्रभाग अधिकारी कुंदन वळवी यांच्या आदेशानुसार पालिकेच्या विध्वंस पथकाने दोन स्वतंत्र पथकांमार्फत ही कारवाई केली. सहाय्यक अभियंता राजेश सोनवणे व उपअभियंता सुहास घोलप यांच्या नेतृत्वाखालील पहिल्या पथकाने मार्वे रोडवरील साईकृपा नगर

परिसरात सुमारे ४० बेकायदेशीर बांधकामे पाडली.तर सहाय्यक अभियंता विजय मानकर व उपअभियंता प्रशांत तावडे यांच्या नेतृत्वाखालील दुसऱ्या पथकाने मालाड लिंक रोडवरील वळनई परिसरात सुमारे ३० बेकायदेशीर बांधकामे निष्कासित केली. निवडणूक काळात अधिकाऱ्यांच्या व्यस्ततेचा गैरफायदा घेत ही बांधकामे उभारण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. या संयुक्त कारवाईत चार जेसीबी मशीन, ३० कामगार तसेच सुमारे १० पालिका अधिकारी व कर्मचारी सहभागी होते. कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून परिसरात चोक पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. यावेळी डीएमसी भाग्यश्री कापसे यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, पी/उत्तर वॉर्डमध्ये बेकायदेशीर बांधकामे कोणत्याही परिस्थितीत खपवून घेतली जाणार नाहीत. अशा कारवाया यापुढेही सातत्याने सुरू राहतील.

संपादकीय

अखेर ती वेळ आलीच

जनतेची फक्त थोडीफार अपेक्षा असते,की आपल्या विभागातील सुख सुविधा आपल्या नगरसेवकांपुढे ठेवणे, मग त्यात पाणीपुरवठा, गटारे, उद्याने, रस्ते, पदपथ, वाहतूक सारख्या तत्सम गोष्टी सुरळीत ठेवणे व लोकाभिमुख असणे. त्यामुळे नागरिकांना सुखाचे जीवन जगता येणे एवढीच अपेक्षा असते, ती नगरसेवकांच्या मार्फत पूर्ण होते. आता ती पूर्ण होईल अशी नागरिकांची अपेक्षा.मुंबईच्या प्रथम नागरिक म्हणजेच महापौर पदासाठी शनिवारी भाजपतर्फे अर्ज भरण्यात आला. मुंबईच्या प्रथम नागरिक म्हणून रितू तावडे यांचे नाव निश्चित झाले. विरोधी पक्षातर्फे कोणाचेही नाव निश्चित न झाल्याने आता बुधवारी रितू तावडे या महापौर बनणार हे निश्चित. म्हणजे आता मुंबई महानगरपालिकेचा कारभार पुन्हा पाच वर्षांनी का होईना सुरू होणार हे महत्त्वाचे. त्याचप्रमाणे इतर समित्यांचेही अध्यक्ष ठरतील आणि मुंबईकरांच्या समस्यांना कोणीतरी वाली निर्माण होईल व समस्या सुटतील अशी अपेक्षा धरायला हरकत नाही. एकदा का वैधानिक समित्या सुरू झाल्या, की पालिकेचे कामकाज सुरळीतपणे सुरू होईल. पाच वर्षे हीच सत्ता अधिकाऱ्यांच्या हातात होती. भले राज्यातील सत्ताधारी यावर नियंत्रण ठेवून होते मात्र काही प्रमाणात पालिका अधिकाऱ्यांची मनमानी एकाधिकार शाही सुरू होती, त्यावर आता चाप बसेल व अंकुश ठेवणे सोपे जाईल कारण आता खरेखुरे ट्रस्टी खऱ्या अर्थाने जनतेने निवडून दिलेले सेवक म्हणजेच नगरसेवक यांचा यावर अधिपथ्य स्थापन होईल आणि अशी अपेक्षा जनतेची असेल. जनतेची फक्त थोडीफार अपेक्षा असते आपल्या विभागातील सुख सुविधा आपल्या नगरसेवकांपुढे ठेवणे किंवा नवीन सुविधा निर्माण करणे, मग त्यात पाणीपुरवठा, गटारे, उद्याने, रस्ते, पदपथ, वाहतूक सारख्या तत्सम गोष्टी सुरळीत ठेवणे व लोकाभिमुख असणे हेच व त्यामुळे नागरिकांना सुखाचे जीवन जगता येणे एवढीच अपेक्षा असते,ती नगरसेवकांच्या मार्फत पूर्ण होते. आता ती पूर्ण होईल अशी नागरिकांची अपेक्षा.मुंबईचे महापौर या पदावर स्थानापन्न झाल्यावर लगेच स्थायी समिती, आरोग्य समिती, बेस्ट समिती यासारख्या समित्याही लवकरच स्थापना केल्या जातील व त्यांचे अध्यक्ष घोषित होतील. मुंबई महानगरपालिकेचे सध्या सर्व आलबेल चालले असले, तरी मुंबई महानगरपालिकेच्या एक अविभाज्य अंग असलेल्या बेस्ट उपक्रमाची मात्र सध्या अवस्था बिकट झाली आहे. एक चांगला उपक्रम प्रशासनावरच्या व राज्यकर्त्यांच्या दुर्लक्षपणामुळे कशाप्रकारे मोडीस निघतो याचे उदाहरण म्हणजे बेस्ट उपक्रम. आज मुंबई महानगरपालिका आर्थिकदृष्ट्या सक्षम आहे. निदान कर्मचाऱ्यांचे वेतन तरी वेळेवर होते. मात्र त्याच दुसरीकडे बेस्ट उपक्रमाकडे वेतन द्यायलाही महिना अखेर पैसे उपलब्ध होत नाही. बेस्ट कर्मचाऱ्यांच्या वेतनावर प्रचंड पैसा खर्च होतो. म्हणून पालिकेच्या दबावाने बेस्टवर खाजगीकरण मोठ्या प्रमाणात लादले गेले. मात्र दुसरीकडे मात्र पालिकेचे खाजगीकरण त्या प्रमाणात होऊ शकले नाही. मात्र बेस्ट उपक्रमात बेस्ट कर्मचारी बस गाड्यांपासून इतर सर्व गोष्टी कंत्राटदारांमार्फत मुंबईकरांवर लादल्या गेल्या.आज त्याचाच परिणाम म्हणजे कंत्राटीकरण झालेल्या बेस्ट बस गाड्यांमुळे प्रवाशांनाच मोठ्या प्रमाणावर त्रासाला सामोरे जावे लागत आहे. बेस्ट बस गाड्यांची संख्या कमी झाली, नवीन बस वेळेवर येत नाही, रस्त्यावरील बस गाड्यांची संख्या कमी झाल्यामुळे प्रवाशांची संख्या कमी झाली, बस गाड्यांवर काम करण्यास कंत्राटदारांना अपुऱ्या वेतनामुळे कर्मचारी मिळत नाही, त्यामुळे प्रवासी घटले व बेस्टचे उत्पन्नही घटले. खरंच खाजगीकरणामुळे बेस्ट उपक्रम फायद्यात येऊ शकेल का? मात्र त्याचे उत्तर अजूनही नाही असेच म्हणावे लागेल. कारण ज्या मोठ्या प्रमाणावर बेस्टला तोटा होत होता तो कमी करण्यासाठी खाजगीकरण आणले गेले असे समर्पक उत्तर मिळते. मात्र एकेकाळी दोन ते तीन हजार करोडचा निव्वळ तोटा असलेला बेस्ट उपक्रम आज तब्बल १३ ते १४ हजार करोड तोट्यात गेला.आतापर्यंत मुंबई महानगरपालिकेने बेस्ट प्रकरणास आपली पालक संस्था म्हणून आठ ते नऊ हजार करोड रुपये दिलेत. त्यामुळे बेस्ट उपकरणाचा तोटा काही अंशी भरून निघत आहे. मात्र आता मुंबई महानगरपालिकेनेही हात वरती केला असून बेस्ट उपक्रम लवकरच सुधारला नाही तर यापुढे मदत मिळणार नाही असे फर्मान सोडले आहे. त्यामुळे बेस्ट प्रकरणाची अवस्था अजूनच बिकट झाली आहे. तर दुसरीकडे बेस्ट उपक्रमांमधून निवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांची अवस्था ही अत्यंत बिकट झाली. आज कित्येक कर्मचाऱ्यांनी आत्महत्या केली आहे, तर कित्येक कर्मचारी अजूनही दडपणाखाली आहेत. त्यांना त्यांच्या मुलांची लग्न करणे कठीण होऊन बसले आहे. तर किती कर्मचाऱ्यांच्या पाल्यांचे शिक्षण थांबले आहे. दर दोन ते तीन महिन्यांनी विविध संघटनांच्याखाली बेस्टच्या निवृत्त कर्मचाऱ्यांना आंदोलने व उपोषण करावी लागत आहे. मध्यंतरी बेस्ट उपक्रमाने बस भाडेवाढ केली मात्र भाड्याने घेतलेल्या बस गाड्यांच्या कंत्राटदारांचे पैसे प्रथम अदा केले जातात मग राहिलेल्या पैशातून बेस्ट उपक्रमाचा दैनंदिन गाडा हाकला जातो. मग ते त्यातून काहीच नाही मग बेस्ट निवृत्त कर्मचाऱ्यांचे पैसे कसे अदा करणार? बेस्ट उपक्रमाचे गंगाजळी आज पूर्णपणे रिती झाली आहे. आज महापौर बसला तर उद्या बेस्ट समिती स्थापन होईल. बहुतेक बेस्ट समिती शिंदे गटाला मिळण्याची दाट शक्यता आहे. मात्र खाजगीकरणामुळे आज बेस्टमध्ये तसे विशेष काही राहिलेले नाही. आज मात्र तोट्यातून बाहेर येण्यासाठी बेस्ट उपक्रम मोक्याचे भूखंड बस आगारे, बस स्थानके, विद्युत संग्रह केंद्रे यांच्या जागेचा व्यावसायिक वापर करून बेस्ट उपक्रम फायद्यात येईल अशी अपेक्षा आहे. बेस्ट उपक्रमातील मोक्याच्या जागांचा व्यवसायिक वापर कसा करता येईल याकडे साऱ्या यंत्रणांचे लक्ष लागले आहे. त्यामुळे जरी व्यावसायिक वापर केला तरी त्यातून बेस्ट उपक्रम फायद्यात कसा येईल की ज्यामुळे बेस्ट उपक्रम पण टिकेल त्यातून स्वमालकीच्या बस गाड्या घेता येतील. कर्मचारी भरती होईल व पुन्हा बेस्ट उपक्रमास त्याचा पूर्वीचा नावलौकिक प्राप्त होईल असा अध्यक्ष सध्या बेस्ट उपक्रमास भावा, . तरच मुंबईकरांची शान टिकेल, बेस्ट कर्मचारी टिकेल व बेस्ट बस उपक्रमातून प्रवास करणारे लाखो प्रवासी यांचा बेस्ट उपक्रम ही टिकेल हे नक्की!

बृहनमुंबई महानगरपालिकेत हजारो कोटींचा कथित भ्रष्टाचार उघडकीस

आरटीआय कार्यकर्ते गणेश राणू ननवरे यांचा गंभीर आरोप; अनेक वरिष्ठ अधिकारी व ठेकेदार रडारवर

दैनिक वादळ वार्ता
मुंबई । अरविंद बनसोडे कुरनूरकर

बृहनमुंबई महानगरपालिकेत (BMC) गेल्या अनेक वर्षांपासून विकासकामांच्या नावाखाली कागदोपत्री कामे दाखवून हजारो कोटी रुपयांचा भ्रष्टाचार झाल्याचा गंभीर आरोप सामाजिक कार्यकर्ते व आरटीआय कार्यकर्ते गणेश राणू ननवरे यांनी केला आहे. वार्ड 'ए'सह मुंबईतील विविध विभागांमध्ये प्रत्यक्षात काम न करता केवळ कागदावरच कामे पूर्ण झाल्याचे दाखवून महानगरपालिका अधिकारी व ठेकेदार संगनमताने जनतेचा पैसा लुटत असल्याचे ननवरे यांनी सांगितले. या प्रकरणासंदर्भात त्यांनी महत्त्वाचे दस्तऐवज हस्तगत केले असून, त्याबाबत अनेक वेळा वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे लेखी तक्रारी व निवेदने सादर केली आहेत. मात्र, संबंधित अधिकाऱ्यांकडून या तक्रारींकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करण्यात आल्याचा आरोपही त्यांनी केला. पत्रकार परिषदेत बोलताना गणेश ननवरे म्हणाले की, या प्रकरणात अनेक भ्रष्ट अधिकारी, दलाल व ठेकेदार अडकण्याची दाट शक्यता आहे. जनतेचा पैसा मोठ्या प्रमाणावर लुटला गेला असून, संबंधितांवर लवकरच गुन्हे दाखल करण्यात येणार आहेत.

या कथित घोटाळ्याची रक्कम चार हजार कोटी रुपयांपेक्षा अधिक असल्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. गणेश ननवरे यांनी यापूर्वीही विविध भ्रष्टाचार प्रकरणांचा पर्दाफाश करून देशविरोधी व जनविरोधी कारवायांविरोधात ठाम भूमिका घेतली आहे. मात्र, या गंभीर बाबी उघड करूनही अद्याप त्यांना कोणतेही शासकीय संरक्षण किंवा ठोस सहकार्य मिळाले नसल्याचे त्यांनी नमूद केले.आता बृहनमुंबई महानगरपालिका त्यांच्या रडारवर असून, येत्या काळात अनेक वरिष्ठ अधिकारी व ठेकेदारांवर मोठी कारवाई होण्याचे संकेत स्पष्ट दिसत आहेत. या प्रकरणामुळे मुंबईच्या प्रशासकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे .

अमृत बीड जिल्हा कार्यालयात समस्त ब्राह्मण संघर्ष समितीचे राष्ट्रीय अध्यक्ष धनंजय कुलकर्णी यांची सदिच्छा भेट ; योजनांबाबत सविस्तर चर्चा

दैनिक वादळ वार्ता
बीड । प्रतिनिधी

समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी कार्यरत असलेल्या अमृत संस्थेच्या बीड जिल्हा कार्यालयात समस्त ब्राह्मण समाज संघर्ष समितीचे संस्थापक अध्यक्ष तथा भारतीय जनता मजदुर संघाचे महाराष्ट्र राज्य सचिव श्री.धनंजय कुलकर्णी यांनी सदिच्छा भेट दिली. या भेटीदरम्यान अमृत संस्थेमार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजना, उपक्रम व समाजोपयोगी कार्याबाबत सखोल चर्चा करण्यात आली.यावेळी अमृतचे जिल्हा व्यवस्थापक श्री.विशाल जोशी यांनी संस्थेच्या कार्यपद्धतीची माहिती देत सांगितले की,अमृतच्या योजनांचा मुख्य उद्देश समाजातील दुर्लक्षित व लाभापासून वंचित घटकांपर्यंत विकासाच्या संधी पोहोचवणे हा आहे. शिक्षण,कौशल्य विकास, रोजगाराभिमुख प्रशिक्षण

तसेच आर्थिक स्वावलंबनासाठी अमृत संस्था सातत्याने कार्यरत असल्याचे त्यांनी नमूद केले.श्री.धनंजय कुलकर्णी यांनी अमृतच्या कार्याचे कौतुक करत सांगितले की,अमृतच्या योजना या समाजाला योग्य दिशा देणाऱ्या असून अधिकाधिक नागरिकांनी या योजनांची माहिती घेऊन त्याचा लाभ घ्यावा अशा उपक्रमांमुळे युवकांना नवीन संधी उपलब्ध होतात व विकासाचा मार्ग प्रशस्त होतो.माझ्या परीने संपूर्ण महाराष्ट्रात अमृत योजनांना मी नेहमी पाठबळ देत आलो असून पुढेही विविध प्रशिक्षण कार्यक्रम राबवण्यासाठी सहकार्य करणार आहे.

योजनांचा लाभ घेऊन समाजातील कुटुंबे सक्षमपणे उभी राहावीत यासाठी आणखी नवीन योजना तसेच कर्ज उपलब्धतेसंदर्भात बँकांचे सहकार्य मिळणे आवश्यक असल्याचेही त्यांनी यावेळी नमूद केले.

अमृतसंस्थेच्या उपक्रमांना आपण नेहमीच सकारात्मक पाठबळ देत राहू,असे आश्वासन देत समाजातील लोकांनी अमृतच्या विविध योजनांचा लाभ घ्यावा यासाठी जनजागृती करण्याचे आवाहन त्यांनी संवाद साधताना केले. या प्रसंगी श्री.धनंजय कुलकर्णी यांच्यासोबत श्री.शिवराज मुथळे हे देखील उपस्थित होते. अमृत बीड जिल्हा कार्यालयाच्या वतीने मान्यवरांचे स्वागत करण्यात आले.यावेळी अमृतचे जिल्हा उप व्यवस्थापक श्री.दिगंबर जोशी,अमृतसखी श्रीमती मनीषा टाकळकर आदी मान्यवर उपस्थित होते.

शेतीनिष्ठ शेतकरी कै.नारायण आबा शिंदे यांच्या पुण्यस्मरणा निमित्त होळ येथे विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप, सामाजिक बांधिलकीचा आदर्श उपक्रम

दैनिक वादळ वार्ता
केज । प्रतिनिधी

केज तालुक्यातील होळ येथील शेतीनिष्ठ शेतकरी कै.नारायणराव व्यंकटराव शिंदे (आबा) यांच्या पुण्य स्मरणानिमित्त जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, होळ वस्ती साठे नगर येथील विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचेवाटप करण्यात आले.हा उपक्रम कै. नारायण आबा शिंदे यांचे नातू अड.राजेश भैय्या शिंदे यांच्या पुढाकारातून पार पडला. कै.नारायण आबा शिंदे यांनी आयुष्य भर शेतीत काबाडकष्ट करून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करत पुढील पिढीला शिक्षणाच्या प्रवाहात आणले.त्यांच्या याच संस्कारांना स्मरून आजोबांच्या पुण्यस्मरणा निमित्त समाजासाठी काहीतरी करण्याची सामाजिक बांधिलकी आपण स्वीकारल्याचे मत यावेळी अड.राजेश भैय्या शिंदे यांनी व्यक्त केले. आजोबांच्या कष्टामुळेच आम्हाला उच्च शिक्षणाची संधी मिळाली असून,त्या ऋणाची परतफेड समाज कार्याच्या माध्यमातून करणे हेच आमचे कर्तव्य आहे,असे त्यांनी सांगितले

या कार्यक्रमास त्यांचे बंधू प्रेम भैय्या शिंदे,शाळेतील शिक्षक ओव्हाळ सर, इंगळे मॅडम तसेचविद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.शालेय साहित्य मिळाल्याने विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद झळकला.हा उपक्रम केवळ पुण्य स्मरणापुरताच मर्यादित न राहता शिक्षण,सामाजिक भान आणि मूल्यांची जपणूक करणारा ठरल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली. कै.नारायण आबा शिंदे यांच्या स्मृतीस अशा समाजोपयोगी कार्यातून दिलेली मानवंदना सर्वांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

जवळबन उपकेंद्रातून शेतीसाठी दिवसभर वीज पुरवठा; सौर प्रकल्पामुळे शेतकऱ्यांना मोठा दिलासा

दैनिक वादळ वार्ता
केज । प्रतिनिधी

केज तालुक्यातील जवळबन वीज उपकेंद्रात ५ एमव्हीए क्षमतेचा सौर ऊर्जा प्रकल्प कार्यरत झाल्यामुळे परिसरातील आनंदगाव,सारणी व जवळबन शिवारातील शेतकऱ्यांना शेतीसाठी आता दिवसभर मुबलक वीज पुरवठा उपलब्ध होत आहे.अशी माहिती उप केंद्राचे कनिष्ठ अभियंता प्रकाश वैरागे यांनी दिली.

रब्बी हंगाम सध्या जोमात सुरू असून ज्वारी,गहू, हरभरा,ऊस यांसारख्या पिकांना वेळेवर पाणी देणे अत्यंत गरजेचे असते.पूर्वी अपुऱ्या वीजपुरवठ्यामुळे शेतकऱ्यांना रात्री उशिरा शेतात जाऊन पाणी द्यावे लागे.अंधार,वन्यप्राण्यांचा धोका आणि अपघाताची भीती यामुळे शेतकऱ्यांना मोठा त्रास सहन करावा लागत होता.शेतकऱ्यांची ही अडचण लक्षात घेऊन वीज वितरण विभागाने जवळबन उपकेंद्रात सौर ऊर्जा प्रकल्प उभारला. या प्रकल्पातून आता थ्री-फेज वीज दिवसभर उपलब्ध होत असून सिंचनासाठी मोठी मदत होत आहे.यामुळे पिकांना वेळेवर पाणी मिळत असल्याने उत्पादनात वाढ होण्याची शक्यता शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे.स्थानिकशेतकऱ्यांनी सांगितले की,पूर्वी रात्री पाणी देताना अनेक अडचणी यायच्या.आता दिवसा वीज मिळत असल्याने कामसोपे झाले आहे आणि धोका कमी झाला आहे.वीज पुरवठ्याचे नियोजन आणि तांत्रिक कामकाज सुरळीत पारपाडण्यासाठी वरिष्ठ तंत्रज्ञ डी.बी.पुरी, आर.जी.राठोड आणि एस.एस.फड यांचे सहकार्य लाभतअसल्याचे ही वैरागे यांनी नमूद केले. शेतकऱ्यांच्या अडचणी तत्परतेने सोडवण्याचा प्रयत्न विभागाकडून केला जात असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.सौर ऊर्जेच्या माध्यमातून ग्रामीण भागातील शेतीला बळकटी देण्याचा हा उपक्रम ठरत असून वीज वितरण कंपनीबद्दल शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त केले आहे.या प्रकल्पामुळे शेती उत्पादन वाढीस चालना मिळून स्थानिक अर्थव्यवस्थेलाही हातभार लागणार आहे.

अजितदादांच्या निधनामुळे राष्ट्रवादीचा मोठा निर्णय

झेडपी निवडणुकीत विजय मिळाला तरी आनंदोत्सव नाही; सुनील तटकरेंचे कार्यकर्त्यांना आवाहन

दैनिक वादळ वार्ता
मुंबई (वृत्तसंस्था)

उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष अजित पवार यांच्या अपघाती निधनामुळे संपूर्ण महाराष्ट्र अद्याप धक्क्यातून सावरलेला नाही. एकीकडे पवार कुटुंबातील सदस्य आणि कार्यकर्ते या दुःखातून सावरत असतानाच, दुसरीकडे राज्यातील जिल्हा परिषद निवडणुकांचा निकाल तोंडावर आहे. या पार्श्वभूमीवर खासदार सुनील तटकरे यांनी पक्षाच्या सर्व कार्यकर्त्यांना आणि पदाधिकाऱ्यांना एक अत्यंत महत्त्वाचे आणि भावनिक आवाहन केले आहे. जिल्हा परिषद निवडणुकीत पक्षाचा विजय झाला, तरी कोणताही आनंदोत्सव साजरा करू नका, असे [illegible] त्यांनी दिले आहेत.उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे २८ जानेवारी रोजी विमान अपघातात निधन झाले. अजित पवार हे जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीच्या सभांसाठी मुंबईहून बारामतीकडे येत होते. मात्र त्यांच्यावर काळाने झडप घातली. आज राज्यातील १२ जिल्हा परिषद आणि १२५ पंचायत समित्यांसाठी मतदान प्रक्रिया पार पडली. सोमवार ९ फेब्रुवारी रोजी निकाल जाहीर होणार आहे. या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी सोशली मीडियावर पोस्ट करत, कार्यकर्त्यांना उपरोक्त आवाहन आणि विनंती केली आहे. सुनील तटकरे आपल्या पोस्टमध्ये म्हणाले, प्रिय सहकारी, उमेदवार आणि पक्षाचे कार्यकर्ते, महाराष्ट्रातील जिल्हा परिषद निवडणुकांचे मतदान शांततेत पार पडले आहे. या संपूर्ण प्रक्रियेत आपण सर्वांनी घेतलेल्या परिश्रमाबद्दल आणि दाखवलेल्या शिस्तीबद्दल मी आपले मनापासून आभार मानतो. महाराष्ट्रातील जनतेकडून माननीय अजितदादांच्या विचारांना आणि आपल्या राष्ट्रवादी पक्षाला पाठिंबा मिळेल, अशी आम्हाला अपेक्षा आहे.त्याचवेळी, आपल्या सर्वांच्या लाडक्या नेत्याच्या निधनामुळे आपण दुःखाच्या काळातून जात आहोत. या पार्श्वभूमीवर ९ तारखेला निकाल जाहीर झाल्यानंतर कोणत्याही प्रकारचे विजय सोहळे साजरे करताना संयम पाळावा, ही नम्र विनंती आहे.विजय मिरवणुका, रोड शो, फटाके फोडणे, रंग उधळणे किंवा कोणत्याही प्रकारचे सार्वजनिक जल्लोष टाळावा. दादांच्या स्मृतींना खरी श्रद्धांजली म्हणजे संयम, शिस्त आणि साधेपणा राखणे हेच आहे. ही विनंती सर्वांनी मान्य करून त्याचे पालन करावे, अशी अपेक्षा आहे, असेही सुनील तटकरे यांनी म्हटले आहे.दरम्यान, अजित पवारांच्या निधनानंतर दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसच्या विलीनीकरणाच्या चर्चांना वेग आला आहे. अजितदादांचे पुत्र पार्थ पवार हे गेल्या काही दिवसांपासून ज्येष्ठ नेते शरद पवार आणि रोहित पवार यांच्यासोबत ठिकठिकाणी दिसत आहेत. यामुळे पवार कुटुंब पुन्हा एकत्र येण्याची शक्यता वर्तवली जात असली, तरी पक्षातील काही ज्येष्ठ नेते विलीनीकरणाबाबत साशंक असल्याचे बोलले जात आहे.

सातपुड्यात भक्तीचा जागर;देवबारा येथे 'वाघदेव' यात्रोत्सवाला प्रारंभ

सातपुड्यातील पंचमंडळी होणार सहभागी

दैनिक वादळ वार्ता
रवींद्र वळवी मोलगी । प्रतिनिधी



निसर्गपूजा आणि समृद्ध परंपरेचा वारसा जपणाऱ्या सातपुड्यात सणोत्सवांची लगबग सुरू झाली आहे. धडगाव तालुक्यातील धडगाव-शहादा रस्त्यावरील देवबारा (नणंद-भावजाई) येथे रविवार ८ फेब्रुवारीपासून दोन दिवसीय 'वाघदेव यात्रोत्सवा'ला उत्साहात सुरुवात झाली असून, संपूर्ण परिसर भक्तीमय वातावरणाने न्हाऊन निघाला आहे.

आदिवासी संस्कृतीत वाघदेवाला संरक्षणाचे प्रतीक मानले जाते. जंगलात राहणाऱ्या वाघाने गावशिवारातील पशु-पक्षी आणि मानवावर हल्ला करू नये, तसेच वाड्या-वस्त्यांवर सुख-समृद्धी नांदावी, या भावनेतून महाशिवरात्रीपूर्वी वाग्देवतेचे पूजन करण्याची शेकडो वर्षांची परंपरा आजही कायम आहे. या पूजनानंतरच सातपुड्यातील तोरणमाळ आणि देवमोगरा येथील मोठ्या यात्रांना खऱ्या अर्थाने सुरुवात होते.

या यात्रेचे मुख्य आकर्षण म्हणजे आदिवासी बांधवांची पारंपरिक वेशभूषा.डोक्यावर पांढरे कापड बांधलेल्या बांबूच्या टोपल्या घेऊन महिला वाघदेवाची स्तुतीगीते सादर करतात.
नवीन बांबूच्या टोपलीत आणलेले धनधान्य आणि महूफुलाच्या अर्काचा नैवेद्य वाघदेवाला अर्पण केला जातो. मुख्य पुजारी दिवाल्या राहसे, हात्या ठाकरे व सामल्या गेंद्रे हे गेल्या काही दिवसांपासून 'पालनी' (व्रत) पाळत असून, त्यांच्या हस्ते सर्व धार्मिक विधी पार पडणार आहेत. केवळ धार्मिक विधीच नव्हे, तर जनजागृतीसाठीही ही यात्रा महत्त्वाची ठरते. रात्रीच्या वेळी होणाऱ्या सोंगाड्यांच्या कार्यक्रमातून स्थानिक कलावंत गीत आणि नाटकातून 'वाघ संवर्धन' काळाची गरज कशी आहे, याबाबत भाविकांचे प्रबोधन करणार आहेत.

या उत्सवासाठी ट्रस्टचे अध्यक्ष रामसिंग राहसे, पोलीस पाटील गौतम राहसे आणि मांडवी खुर्द च्या सरपंच मिना कपात राहसे यांच्यासह मांडवी, खामला, काकरदा, घाटली, निगदी, तेलखेडी, वलवाल, गोरांबा या गावातील पंचमंडळींनी विशेष परिश्रम घेतले आहेत. देवबारा येथील दर्शनानंतर भाविक गुजरात मधील देवमोगरा तसेच मोलगी आणि दाब कडे प्रयाण करतील.

माता रमाई यांच्या जीवनातून संघर्ष व त्यागाची प्रेरणा घ्यावी-डॉ.जाधव

तुलसी शैक्षणिक समूहात माता रमाई जयंती उत्साहात साजरी

दैनिक वादळ वार्ता
बीड । प्रतिनिधी

माता रमाई आंबेडकर यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना शिक्षण आणि समाजकार्यासाठी भक्कम पाठबळ दिले. त्यांच्या त्याग, संयम आणि समर्पणामुळेच बाबासाहेबांना समाज परिवर्तनाचे महान कार्य करता आले. माता रमाई यांच्या जीवनातून संघर्ष, त्याग आणि कर्तव्यनिष्ठेची प्रेरणा घेणे आजच्या पिढीसाठी अत्यंत आवश्यक असल्याचे प्रतिपादन प्रसिद्ध वक्त्या डॉ. प्रतिभा जाधव यांनी केले.तुलसी शैक्षणिक समूह, बीड यांच्या वतीने माता रमाई आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त शनिवार दि. ७ रोजी तुलसी संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालयात व्याख्यान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी तुलसी शैक्षणिक समूहाचे संचालक प्रा. प्रदीप रोडे होते. तर, प्रमुख पाहुणे म्हणून मा.निलेश कदम, प्रा.डी.डी.राऊत, प्रा.डी.जी. निकाळजे, डॉ.अश्विनी बेद्रे व प्रा.प्रकाश ढोकणे उपस्थित होते.डॉ.जाधव यांनी आपल्या व्याख्यानात माता रमाई आंबेडकर यांच्या संघर्षमय जीवनावर प्रकाश टाकत त्यांच्या त्याग, संयम आणि समर्पणाची प्रेरणादायी उदाहरणे विद्यार्थ्यांसमोर मांडली. महापुरुषांचे विचार प्रत्येकाच्या मनामध्ये रुजले पाहिजेत आणि त्यांच्या कार्याचा आदर्श आपल्या जीवनात उतरवला पाहिजे. आपण त्यांच्या पायाची धूळ होण्याइतके जरी त्यांचे विचार आत्मसात केले तरी जीवन समृद्ध होऊ शकते, असे त्यांनी सांगितले.
त्या पुढे म्हणाल्या की, जगण्याला एक ठोस तत्व असले पाहिजे. केवळ जन्माला आलो म्हणून जगणे हे खरे जीवन नसून, आव्हानांचा सामना करत जगण्यातच खरी मजा आहे. महापुरुषांनी आपल्या जीवनात प्रत्येक पावलावर संघर्ष केला आणि म्हणूनच त्यांची आठवण शतकानुशतके जिवंत आहे. चांगले कार्य करणारी माणसे कधीच मरत नाहीत; त्यांच्या मृत्यूनंतरही त्यांचे विचार समाजाला दिशा देत राहतात. आपण वास्तववादी जीवन जगले पाहिजे, विज्ञाननिष्ठ दृष्टिकोन स्वीकारला पाहिजे आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे संविधानवादी विचारसरणी जोपासणे आवश्यक असल्याचेही त्यांनी स्पष्ट केलेअध्यक्षीय भाषणात प्रा. प्रदीप रोडे यांनी स्त्री-पुरुष समानतेचे महत्त्व अधोरेखित केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी 'थॉट्स ऑन पाकिस्तान' या ग्रंथामधून माता रमाईंच्या त्यागाचा गौरव केला असल्याचे त्यांनी नमूद केले. त्यांच्या जीवनातून प्रेरणा घेऊन कुटुंब आणि समाजात समानतेचा विचार आचरणात आणण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.योगिता लांडगे यांनी केले, तर आभार प्राचार्य डी.डी.राऊत यांनी मानले. कार्यक्रमास संस्थेच्या विविध युनिटमधील पदाधिकारी, प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत परळी नगर परिषदेला उपलब्ध शववाहिनीचे लोकार्पण

दैनिक वादळ वार्ता
बीड । प्रतिनिधी

राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत आरोग्य विभागाच्या वतीने जिल्हा नियोजन समिती अंतर्गत धनंजय मुंडे यांच्या मागणीनुसार परळी नगर परिषदेला अत्याधुनिक शववाहिनी उपलब्ध झाली असून आज नागरिकांच्या सेवेत रुजू करण्यात आली. या शववाहिनीचे लोकार्पण नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी व पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत करण्यात आले.

महाराष्ट्र शासनाच्या आरोग्य विभागातून नगरपालिकांना विविध सेवा सुविधा पूरक बाबींची पूर्तता करण्यात येते. त्या अनुषंगाने हा धनंजय मुंडे यांच्या मागणीनुसार राष्ट्रीय आरोग्य अभियाना अंतर्गत जिल्हा नियोजन समिती निधीतून परळी शहरासाठी शववाहिनी मंजूर करण्यात आली.अत्याधुनिक व सर्व सुविधांनी युक्त अशी सुसज्ज शववाहिनी नागरिकांसाठी अत्यावश्यक सुविधांध्ये समाविष्ट होते. परळी नगर परिषदेला संसाधनामध्ये भर घालणारी आणखी एक शववाहिनी उपलब्ध झाली आहे. या शववाहिणीचे लोकार्पण आज परळीच्या नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी माजी नगराध्यक्ष बाजीराव भैय्या धर्माधिकारी, गटनेते वैजनाथ सोळंके, बांधकाम सभापती पवन मुंडे, नगरसेवक पिंटू मुरकुटे, रमेश पवार,,नितीन रोडे,, शेख बब्बू आदींसह नप अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

तत्कालीन पालकमंत्री यांनी मंजूर केली होती ही शववाहिनी

दरम्यान, राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित दादा पवार यांना कायमच कामाचा माणूस म्हणून ओळखले जाते. सर्व दृष्टिकोनातून जनहिताला प्राधान्य देत लोकांना उपयुक्त ठरणाऱ्या प्रत्येक बाबीसाठी अजितदादांचे नेहमीच प्रोत्साहन असायचे. याचेच उदाहरण म्हणजे परळी नगर परिषदेच्या विकासात्मक वाटचालीत सातत्याने अजितदादा पवार हे खंबीर पाठीशी उभे राहिले. विशेष म्हणजे आरोग्य विभागाच्या वतीने परळी नगर परिषदेला उपलब्ध झालेली शववाहिनीही अजितदादा पवार पालकमंत्री असताना त्यांनी मंजूर केली होती. या शववाहिनीचे लोकार्पण करताना अजितदादांच्या छोट्यात छोट्या व मोठ्यात मोठ्या जनहिताच्या कामातील योगदानाचा मुद्दा पुन्हा एकदा अधोरेखित झाला आहे.

श्री क्षेत्र चोंडी येथे सदगूरु चंद्रशेखर बाबा मूर्ती प्राणप्रतिष्ठा वर्धापन दिनानिमित्त भव्य त्रिदिवसीय किर्तन व यज्ञ सोहळा

दैनिक वादळ वार्ता
चोंडी । प्रतिनिधी

श्री क्षेत्र चोंडी येथे सदगुरु चंद्रशेखरबाबा मूर्ती प्राणप्रतिष्ठा वर्धापन दिनानिमित्त भव्य अशा त्रिदिवसीय कीर्तन महोत्सव व यज्ञपूजन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असून, या भक्तीमय उत्सवामुळे संपूर्ण परिसरात अध्यात्मिक आणि भक्तीरसाचे वातावरण
दि. १०, ११ व १२ फेब्रुवारी २०२६ रोजी होणाऱ्या या महोत्सवात राज्यातील नामवंत कीर्तनकार व संत महंतांच्या उपस्थितीत विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

कार्यक्रमाची ठळक वैशिष्ट्ये :

दि. १० फेब्रुवारी (मंगळवार)
श्री. विद्वतरत्न सुनील महाराज, झांबरे आष्टी यांचे सायं. ८ ते १० या वेळेत हरिकिर्तन.

दि. ११ फेब्रुवारी (बुधवार)
श्री. व्याकरणाचार्य अर्जुनजी महाराज लाड गुरूजी, होळ यांचे सायं. ८ ते १० या वेळेत कीर्तन सेवा.

दि. १२ फेब्रुवारी (गुरुवार)
सकाळी १० वाजता सदगुरु चंद्रशेखरबाबा यांच्या पालखी मिरवणुकीसह भव्य सोहळा, त्यानंतर श्री. ह. भ. प. महंत अप्पासाहेब महाराज चौरे यांच्या अमृततुल्य वाणीचे कीर्तन होऊन महाप्रसादाचे आयोजन करण्यात येणार आहे.या त्रिदिवसीय उत्सवात यज्ञपूजन, नामस्मरण, संतांचे प्रवचन, भजन-कीर्तन, पालखी सोहळा व महाप्रसाद यामुळे भाविकांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती राहणार आहे.परिसरात भक्तीचा जागर
या सोहळ्यामुळे चोंडी व परिसरातील ग्रामस्थ, सेवक, वारकरी संप्रदायातील भक्त यांच्यात उत्साहाचे वातावरण असून, हजारो भाविकांच्या उपस्थितीची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे.
कार्यक्रम यशस्वीतेसाठी संयोजक व ग्रामस्थांकडून जय्यत तयारी करण्यात आली असून, सर्व भाविकांनी या पवित्र सोहळ्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.
स्थळ : सदगुरु चंद्रशेखर बाबा संस्थान, श्री क्षेत्र चोंडी, ता. धारूर, जि. बीड

एम.पी.एस.इंग्लिश स्कूलमध्ये माता रमाई यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी

दैनिक वादळ वार्ता
हदगाव । प्रतिनिधी

हदगाव येथील एम.पी.एस. इंग्लिश स्कूलमध्ये त्यागमुर्ती माता रमाई भीमराव आंबेडकर यांची जयंती मोठ्या उत्साहात आणि प्रेरणादायी वातावरणात साजरी करण्यात आली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विश्वरत्न होण्यामागे ज्यांचे मोलाचे योगदान होते, त्या माता रमाईंच्या स्मृतींना यावेळी उजाळा देण्यात आला.

कार्यक्रमाचा वृत्तांत:
अभिवादन सोहळा: कार्यक्रमाची सुरुवात माता रमाई यांच्या प्रतिमेच्या पूजन आणि पुष्पहार अर्पणाने झाली. यावेळी शाळेचे! संस्थापक, सचिन जाधव सर! मुख्याध्यापक आणि शिक्षक वृंद उपस्थित होते.
विद्यार्थ्यांचा सहभाग: शाळेतील चिमुकल्या विद्यार्थ्यांनी माता रमाईंच्या वेशाभूषेत येऊन सर्वांचे लक्ष वेधून घेतले. विद्यार्थ्यांनी आपल्या भाषणांतून रमाईंच्या जीवनातील कष्ट, त्याग आणि धैर्याचे प्रसंग कथन केले.
✲ मार्गदर्शन: शिक्षकांनी आपल्या भाषणात सांगितले की, अत्यंत कठीण परिस्थितीतही डगमगून न जाता बाबासाहेबांच्या पाठीशी खंबीरपणे उभ्या राहणाऱ्या माता रमाई या खऱ्या अर्थाने समाजासाठी आदर्श आहेत.
विविध उपक्रम: जयंतीनिमित्त शाळेत वक्तृत्व स्पर्धा आणि निबंध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.
उत्साही वातावरण: यावेळी संपूर्ण शाळा परिसर 'माता रमाईंचा विजय असो' आणि 'जय भीम'च्या घोषणांनी दुमदुमून गेला होता. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेतील सर्व शिक्षक वृंद , कदम सर,हुलकाने मॅडम, पल्लवी मिस, सुजाता मिस,खामंकर मिस,मिरासे मिस, मिककरे मिस,अंजली मिस,वाठवनकर ताई, उपस्थित होत्या कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. हदगाव परिसरातील पालकांनीही या उपक्रमाचे कौतुक केले आहे.

वनहक्क म्हणजे आदिवासींच्या सन्मान आणि सुरक्षिततेची नवी पहाट-मंत्री डॉ.अशोक वुईके

नंदुरबार जिल्ह्याने वनहक्क अंमलबजावणीत निर्माण केला आदर्श; प्रलंबित १,००० प्रकरणांचा निकाल

दैनिक वादळ वार्ता
नंदुरबार । दिपक गोसावी

वनहक्क कायदा हा केवळ कागदोपत्री अधिकार नसून तो आदिवासी बांधवांच्या सन्मान, सुरक्षितता आणि सर्वांगीण विकासाची नवी वाट आहे, असे प्रतिपादन राज्याचे आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक वुईके यांनी केले. नंदुरबार जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन सभागृहात आयोजित 'वनजमीन पट्टे वाटप' कार्यक्रमात ते बोलत होते.यावेळी आमदार आमशा पाडवी, जिल्हाधिकारी डॉ. मित्तली सेठी, पोलीस अधीक्षक श्रवण दत्त, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी नमन गोयल यांच्यासह आदिवासी विकास विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.मंत्री डॉ. वुईके यांनी नंदुरबार प्रशासनाचे विशेष कौतुक करताना सांगितले की, जिल्हाधिकारी डॉ. मित्ताली सेठी यांनी आदिवासी बांधवांना त्यांचे हक्क मिळवून देण्यासाठी राज्यभर एक वेगळी ओळख निर्माण केली आहे. महसूल, वन आणि आदिवासी विकास विभाग यांच्यातील उत्तम समन्वयामुळेच १,००० हून अधिक प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्यात यश आले आहे.

जमिनीची मोजणी आणि सीमा निर्धारणाचे निर्देश:- केवळ पट्टे वाटप करून प्रश्न सुटणार नाहीत, तर त्या जमिनीची प्रत्यक्ष मोजणी आणि सीमा निश्चित होणे आवश्यक आहे. जोपर्यंत मोजणी होत नाही, तोपर्यंत आदिवासी बांधवांना त्यांच्या जमिनीचा पूर्ण लाभ घेता येत नाही. त्यामुळे नंदुरबार जिल्ह्याने या कामाला प्राधान्य देऊन मोजणीचे प्रश्न तातडीने मार्गी लावावेत, असे कडक निर्देश मंत्र्यांनी प्रशासनाला दिले.सामूहिक वनहक्क असलेल्या दावेदारांना तांत्रिक अडचणींमुळे शासकीय योजनांचा लाभ घेताना मर्यादा येतात. सामूहिक सातबारा असल्यामुळे वैयक्तिक लाभ मिळणे कठीण होते. यावर तोडगा काढण्यासाठी राज्य स्तरावर एक 'मानक कार्यपद्धती' तयार करण्याची गरज असल्याचेही त्यांनी नमूद केले.

महिला आणि शिक्षण क्षेत्रातील प्रगती:-राज्यात नुकत्याच झालेल्या १,७७१ शिक्षकांच्या भरतीमुळे आदिवासी भागातील शाळांना बळकटी मिळाली आहे.'राणी दुर्गावती महिला सबलीकरण योजने'च्या माध्यमातून आदिवासी महिलांना केवळ रोजगार मिळवणारे न ठेवता, इतरांना रोजगार देणाऱ्या 'उद्योजिका' बनवण्याचे शासनाचे उद्दिष्ट आहे.

याप्रसंगी आमदार आमशा पाडवी यांनी लाभार्थ्यांचे अभिनंदन करताना मोलाचा सल्ला दिला. मिळालेले वनपट्टे विकू नका, तर बिरसा मुंडा कृषी विकास योजनेतून विहीर खोदून आधुनिक शेती करा, असे ते म्हणाले. वनविभागाकडून होणारा त्रास कमी करण्यासाठी पात्र लाभार्थ्यांची राहिलेली प्रकरणेही तातडीने चौकशी करून निकाली काढावीत, अशी विनंती त्यांनी प्रशासनाला केली.कार्यक्रमात नवापूर (८), शहादा (६) आणि अक्राणी (५ लाभार्थी).या तालुक्यांतील लाभार्थ्यांना प्रातिनिधिक स्वरूपात वनपट्टे आणि धनादेश वाटप करण्यात आले.शबरी महामंडळ अर्थसहाय्य: योजनेतर्गत ६ महिला लाभार्थ्यांना सबलीकरण योजनेचे धनादेश, ७ लाभार्थ्यांना कृषी सेवा आणि ५ लाभार्थ्यांना लघु उद्योगासाठी मदत देण्यात आली.हा कार्यक्रम नंदुरबार जिल्ह्यातील आदिवासी बांधवांसाठी खऱ्या अर्थाने स्वाभिमानी भवितव्याचा पाया रचणारा ठरला आहे.

कठोरा खुर्द येथे ग्राम सचिवालयाचे लोकार्पण व आयपीएस अधिकारी कांतीलाल पाटील यांचा जाहीर नागरिक सत्कार

केंद्रीय राज्यमंत्री रक्षाताई खडसे व वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे यांची प्रमुख उपस्थिती

दैनिक वादळ वार्ता
जळगाव । जितु इंगळे

रावेर लोकसभा मतदारसंघातील भुसावळ तालुक्यातील कठोरा खुर्द येथे ग्रामदेवत जोगेश्वरी माता ग्राम सचिवालयाचे लोकार्पण तसेच आयपीएस अधिकारी कांतीलाल सुभाष पाटील यांचा जाहीर नागरिक सत्कार सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी केंद्रीय युवक कल्याण व क्रीडा राज्यमंत्री भारत सरकार मा. ना. श्रीमती रक्षाताई खडसे यांनी भूषविले. प्रमुख अतिथी म्हणून महाराष्ट्र राज्याचे वस्त्रोद्योग मंत्री मा. ना. श्री संजय सावकारे तसेच ह.भ.प. गुरुवर्य भरत महाराज (श्री क्षेत्र कुंडलपूर वेडोळे संस्थान) उपस्थित होते.मार्गदर्शन करताना रक्षाताई खडसे यांनी ग्रामस्तरावरील प्रशासन अधिक सक्षम, पारदर्शक व लोकाभिमुख करण्यासाठी ग्राम सचिवालयाची भूमिका महत्त्वाची असल्याचे सांगितले. ग्रामीण भागातील नागरिकांना शासनाच्या विविध लोककल्याणकारी योजनांचा थेट लाभ मिळावा यासाठी केंद्र व राज्य सरकार समन्वयाने काम करत असल्याचे त्यांनी नमूद केले. यावेळी मंत्री संजय सावकारे यांनी ग्रामपंचायत स्तरावरील विकासकामे अधिक गतिमान करण्यासाठी प्रशासन व लोकप्रतिनिधींनी समन्वयाने कार्य करण्याचे आवाहन केले. आयपीएस अधिकारी कांतीलाल पाटील यांच्या सामाजिक व प्रशासकीय कार्याचा गौरव करून ग्रामस्थांच्या वतीने त्यांचा जाहीर नागरिक सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमास सौ. रजनी सावकारे, सरपंच सौ. रोहिणी प्रशांत पाटील, उपसरपंच सौ. मनीषा उमाकांत पाटील, ग्रामपंचायत सदस्य, स्थानिक भाजपा पदाधिकारी, कार्यकर्ते व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

महाराष्ट्र प्रदेश 'भारतीय राष्ट्रीय विद्यार्थी संघा' ची जंगी घोषणा कन्हैया कुमार व वरुण चौधरींच्या नेतृत्वाखाली नवी फळी सज्ज

तळोदा तालुक्याला मिळालं मोठं प्रतिनिधित्व!

दैनिक वादळ वार्ता
नंदुरबार । दिपक गोसावी

भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची विद्यार्थी संघटना असलेल्या 'भारतीय राष्ट्रीय विद्यार्थी संघा' च्या महाराष्ट्र प्रदेश कार्यकारिणीची बहुप्रतिक्षित घोषणा करण्यात आली आहे. राष्ट्रीय प्रभारी कन्हैया कुमार आणि राष्ट्रीय अध्यक्ष वरुण चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यातील नव्या दमाच्या प्रदेश सचिवांची नियुक्ती जाहीर करण्यात आली असून, यामध्ये नंदुरबार जिल्ह्याचा दबदबा पाहायला मिळत आहे.

या निवडीमध्ये उत्तर महाराष्ट्रातील नंदुरबार जिल्ह्याला विशेष महत्त्व देण्यात आले आहे. जिल्ह्यातील सक्रिय कार्यकर्ते शीतल तडवी यांची प्रदेश सचिवपदी निवड झाली असून, विशेष म्हणजे तळोदा तालुक्यातील तुळाजा येथील सचिन राहसे यांचीही प्रदेश सचिव म्हणून वर्णी लागली आहे.तळोदा सारख्या ग्रामीण भागातील नेतृत्वाला राज्याच्या पातळीवर काम करण्याची संधी मिळाल्याने स्थानिक कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. सचिन राहसे यांच्या निवडीमुळे दुर्गम भागातील विद्यार्थ्यांचे प्रश्न आता थेट प्रदेश स्तरावर मांडले जातील, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.महाराष्ट्र 'भारतीय राष्ट्रीय विद्यार्थी संघा' चे प्रदेशाध्यक्ष सागर साळुंके आणि प्रभारी अक्षय यादव यांनी नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन केले आहे. काँग्रेसची विचारधारा तळागाळातील विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी आणि शैक्षणिक चळवळ जिवंत ठेवण्यासाठी ही नवीन फळी महत्त्वाची भूमिका बजावेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे.

दादर येथील 'टिळक भवन' येथून अधिकृत पत्रक प्रसिद्ध होताच सोशल मीडियावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. विशेषतः नंदुरबार आणि तळोदा परिसरात सचिन राहसे यांच्या निवडीचे स्वागत केले जात आहे.

संत रामपाल जी महाराज यांच्या 'बोध दिवसा 'निमित्त ढवळपुरी आश्रमात त्रिदिवसीय सोहळ्याचे आयोजन; विशाल भंडाऱ्याचेही नियोजन

दैनिक वादळ वार्ता
नंदुरबार । दिपक गोसावी

जगतगुरु संत रामपाल जी महाराज यांच्या ✻'बोध दिवसा'✻चे औचित्य साधून अहिल्यानगर जिल्ह्यातील पारनेर तालुक्यातील ढवळपुरी येथील सतलोक आश्रमात दिनांक १५, १६, १७ रोजी भव्य कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवात महाराष्ट्रातील सर्व नागरिकांना परिवारासह आमंत्रित करण्यात येत आहे. केवळ ढवळपुरीच नव्हे, तर देश-विदेशातील संत रामपाल जी महाराज यांच्या सर्व आश्रमांमध्ये हा बोध दिवस मोठ्या प्रमाणावर साजरा केला जाणार आहे. या निमित्ताने सर्वत्र भक्ती आणि सेवेचा संगम पाहायला मिळत आहे.आध्यात्मिक शांतता आणि ज्ञानाच्या प्रसारासाठी आश्रमात अमर ग्रंथ साहेबाचे सलग तीन वाचन केले जाणार आहे. महोत्सवाच्या काळात येणाऱ्या सर्व भाविकांसाठी आणि नागरिकांसाठी शुद्ध सात्विक महाप्रसादाचे (विशाल भंडारा) आयोजन करण्यात आले आहे.

या सोहळ्याचे वैशिष्ट्य म्हणजे महाराष्ट्रातील सर्व नागरिकांना परिवारासह या ठिकाणी आमंत्रित करण्यात आले असून, सामाजिक एकतेचा संदेश दिला जाणार आहे.सतलोक आश्रम ढवळपुरी यांच्या वतीने व्यवस्थापनाने असे आवाहन केले आहे की, जास्तीत जास्त नागरिकांनी या तीन दिवसीय समारोहात सहभागी होऊन आध्यात्मिक ज्ञानाचा आणि महाप्रसाद(भंडाऱ्याचा) लाभ घ्यावा. शिस्तबद्ध नियोजन आणि भक्तीमय वातावरणात हा सोहळा पार पडणार आहे.

वेळूवन बुद्ध विहारात माता रमाई जयंती सोहळा उत्साहात संपन्न

दैनिक वादळ वार्ता
केज । प्रतिनिधी

भारतीय बौद्ध महासभा शहर शाखेच्या वतीने प्रज्ञासूर्याची साउली, त्यागमूर्ती माता रमाई यांची जयंती साजरी करण्यात आली. शहरातील भीमनगरमधील वेळूवन बुद्ध विहारात हा जयंती सोहळा संपन्न झाला.सर्वप्रथम तथागत गौतम बुद्ध,बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर व माता रमाई यांच्या प्रतिमांना पुष्प अर्पण करून सामूहिक त्रिशरन व पंचशील घेण्यात आले.यावेळी उपस्थित भारतीय बौद्ध महासभेचे शहर अध्यक्ष जयपाल मस्के यांनी सर्वांना माता रमाई यांच्या जयंतीच्या निमित्ताने मंगलकामना व्यक्त केल्या व आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी बोलताना ते म्हणाले डॉ. बाबासाहेबांचा आंबेडकरांचा जीवनप्रवास जेवढा संघर्षमय आहे तेवढाच माता रमाईंचा खडतर आहे.पतीने शिकावे व साहेब बनावे यासाठी त्यांनी खूप कष्ट घेतले त्याग केला. बाबासाहेब शिक्षणासाठी परदेशात असताना संसाराचा गाडा नेटाने सांभाळला.डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या उत्तुंग समाजकार्यात रमाई यांनी खंबीर साथ दिली. त्यांचा साधेपणा,कारुण्य,विचार आणि त्याग सगळ्यांना सतत प्रेरणा देत राहील.यावेळी बोलताना त्यांनी माता रमाई यांच्या आयुष्यातील प्रसंग सांगितले.नव प्रशिक्षित समता सैनिकांच्या गणवेश व संचलनाबाबत चर्चा झाली व आवश्यक सूचना देण्यात आल्या.कार्यक्रम प्रसंगी भारतीय बौद्ध महासभेचे चंद्रकांत मस्के यांनीही आपले विचार मांडले. भारतीय बौद्ध महासभा शहर महिला शाखेवर अनिता गायकवाड व उषा साखरे यांची निवड झाल्याबद्दल उपस्थित पदाधिकारी यांनी धम्मयान दिनदर्शिका व पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत केले. यावेळी उषा साखरे यांनीही आपले मनोगत मांडले. कार्यक्रम प्रसंगी विहारात भारतीय बौद्ध महासभेचे माजी शहराध्यक्ष डॉ. प्रभाकर ठोके, भारतीय बौद्ध महासभेचे महेंद्र मस्के,कल्याण मस्के,दीपक मस्के. महिला शाखेच्या सुनीता कांबळे, सुरेखा मस्के,कुसुम मस्के,रत्नमाला मस्के, आशा मस्के, मैना मस्के, अविद्या मस्के, अनिता हजारे, हौसाबाई हजारे, जनाबाई मस्के, पुष्पा मस्के, शीतल लोमटे, वर्षा हजारे, सावित्राबाई कांबळे, गंगुबाई मस्के व इतर बौद्ध उपासक उपासिका बालक बालिका यांची उपस्थिती होती.

विद्यार्थ्यांनी चांगला माणूस व्हावे-डॉ.हनुमंत सौदागर

रामराव पाटील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात दहावीच्या विद्यार्थ्यांना निरोप

दैनिक वादळ वार्ता
केज । प्रतिनिधी

जिद्द चिकाटी मेहनत घेऊन यश संपादन करता येते. विद्यार्थ्यांनी चांगला माणूस व्हावे असे मत डॉ हनुमंत सौदागर यांनी व्यक्त केले ते शहरातील रामराव पाटील माध्यमिक विद्यालयातील इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांच्या निरोप समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष शाळेचे मुख्याध्यापक श्री खोसे, प्रमुख पाहुणे डॉ हनुमंत सौदागर आदी उपस्थित होते. दहावीचा स्वयंशासन दिन व निरोप समारंभ शनिवार रोजी उत्साहात साजरा करण्यात आला . इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट पद्धतीने नियोजन करून स्वयंशासन दिन साजरा केला वर्गशिक्षक श्रीमती गिरी मॅडम यांनी मार्गदर्शन केले. निरोप समारंभाच्या कार्यक्रमात श्री देशमुख , श्रीमती डॉ गिरी,श्री गोरे,श्री गायकवाड,श्री नाईकनवरे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून शुभेच्छा दिल्या. पुढे बोलतांना डॉ सौदागर यांनी विद्यार्थ्यांना स्वयंसिस्ती चे महत्व सांगितले. अध्ययन करत असताना अवधानाचे महत्त्व व सध्याच्या स्थितीमध्ये मुलांचे अवधान टिकवणे किती जिकरीचे झाले आहे याबद्दल मार्गदर्शन केले. अध्यक्षीय समारोप करताना श्री खोसे यांनी विद्यार्थ्यांना आपले ध्येय ठरवून त्या दिशेने मार्गक्रमण करण्यासाठी कसे प्रयत्नशील राहावे याबद्दल मार्गदर्शन केले. कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडला कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रतीक कदम याने तर सर्व नियोजन नववीच्या विद्यार्थ्यांनी केले आभार श्रीमती उगले यांनी केले.कार्यक्रमास विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077